

# गणपती बाप्पा

पु. पां. गोखले

# गणपती बाप्पा

पु. पां गोखले

समाजभूषण बाबुराव गोखले स्मारक समिती,
पुणे विभाग

GANAPATI BAPPA
P. P. Gokhale

प्रकाशक
समाजभूषण बाबुराव गोखले
स्मारक समिती, पुणे विभाग
२७३, शनिवार पेठ,
पुणे ३०

© सर्वहक्क सुरक्षित

प्रकाशन दिनांक
१५ नोव्हेंबर, १९९८

मुद्रक
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ,
नागनाथ पाराजवळ,
पुणे ३०

मूल्य : २०/- रुपये

## अवतार पहिला

# १ : अदितीला बाळ झाले!

हजारो वर्षे झाली. हिमालयाच्या परिसरात कश्यप ऋषींचा आश्रम होता. त्यांच्या गुरुकुलात एकवीसशे बटू शिकत होते. हे सारे विद्यार्थी अगदी मुलासारखे वागून वेद-विद्या घेत. ऋषी कश्यपांची पत्नी अदिती. ती या सर्व विद्यार्थी-मंडळींवर आईसारखे प्रेम करी.

पण अदिती मनात कष्टी होती. तिला वाटे, आपल्याला मुलगा व्हावा; तो शहाण्यांत शहाणा असावा; कर्तबगार असावा; त्याने आपल्या कुळाचे नाव काढावे.

अदितीने पाहिले देवांच्या डोळ्यांकडे. सूर्य व चंद्र हे जग उत्पन्न करणाऱ्या देवाचे डोळे ना! अदितीने सूर्याकडे डोळे लावले. त्याची भक्ती केली. आपल्या मनासारखा मुलगा ती रोज सूर्याकडे मागे.

अदितीला फार दिवसांनी मुलगा झाला. तो सगळ्यांनीपाहिला. सगळे म्हणाले, "असा मुलगा आपण नव्हता पाहिला कधी!" मग अदितीने त्याचे नाव ठेवले, 'वि-नायक'.

याच्यासारखा अगोदर कोणी झाला नाही, असा त्या नावाचा अर्थ होता; याला कोणी सांगायला, शिकवायला नको, याचा हाच शहाणा आहे, असाही या नावाचा अर्थ होता. सावळा रंग, बारीक डोळे, हत्तीसारखे कपाळ, असा मुलगा असला म्हणून काय झाले? तेव्हा ते नाव सगळ्यांना आवडले.

बारशाला जमलेल्या बायका म्हणाल्या, "नाही तरी मुलाचे रूप अपूर्व, तर गुणही अपूर्व ठरतील की! आईने नाव ठेवायचे आणि ते मुलांनी खरे

करून दाखवायचे असते!"

विनायकाचा पाळणा दूर्वांचा केला होता. "गोविंद घ्या, गोपाळ घ्या" असे म्हणून बायकांनी त्याला पाळण्यात घातले. प्रत्येक बाईने त्याला हातात घेतले, पाहिले. बाळाचे सगळे अवयव योग्य तसेच आहेत, अशी आपली खात्री प्रत्येक सुवासिनीने करून घेतली. म्हणून प्रत्येकजण म्हणत होती, "गोविंद घ्या, गोपाळ घ्या".

पाळणा 'जो-जो' म्हणून हलू लागला, तेव्हा हरणे उड्या मारू लागली. पोपट, सारिका, भारद्वाज, कोकिळा गाणी गाऊ लागल्या. अदिती सगळ्या बायकांना हळदीकुंकू देऊन म्हणाली, "मूठ मूठ घुगऱ्या घ्या, आमच्या बाळाला खेळायला न्या."

केवढा तरी अर्थ अदितीच्या विनंतीत होता. "माझ्या बाळाचे नाव ठेवायला तुम्ही आलात; त्याला हलविलेत, डोलवलेत, आपला म्हटलेत. मी कशी होऊ उतराई? तेव्हा या कृतज्ञतेच्या घुगऱ्या घ्या; खा; आणि याच्यापुढेही माझा बाळ तुमच्यांत रमू दे. त्याच्यावर लक्ष ठेवा. तो समाजाचा, राष्ट्राचा, जगाचा होऊ दे." अदितीचा आशय सुवासिनी समजल्या.

■

## २ : मुंज व भिक्षावळ

विनायक सहा वर्षांचा झाला. रांगत असल्यापासून त्याच्या कानांवर आश्रमातील बटूंची शिकवण होतीच. कश्यपांनी त्याची आता मुंज केली. होमकुंडातील अग्नीपुढे त्याने शपथ घेतली– 'मी वेदांचा सखोल अभ्यास करीन. आई, वडील, गुरुजी यांचा मान ठेवीन. देश, देव आणि धर्म यांना विसरणार नाही. जरूर लागली तर या सर्वांसाठी मी सर्वस्व देईन.'

कश्यपांनी मग विनायकाला गायत्री मंत्र दिला. त्याचा जप झाला आणि विनायकास मग भिक्षावळी मिळाल्या. रेणुकेने परशू, शंकराने त्रिशूळ व डमरू, माहेश्वरीने एकवीस मोदक, अश्विनी कुमारांनी दूर्वांकुरांचा रस दिला. अशा कितीतरी मोलामोलाच्या वस्तू विनायकास मिळाल्या. विनायकाला आनंदच आनंद झाला.

■

# ३ : शिस्तीची संघटना

विनायकाचे ब्रह्मचर्यव्रत सुरू झाले. सूर्योपासना चालली. चारही वेदांचा अभ्यास विनायकाने सहा वर्षांत केला. मन, मेंदू, मनगट बलशाली झाले त्याचे. नियमितपणा, नेमकेपणा आणि प्रामाणिकपणा विनायकाच्या अंगी मुरला. या गुणांमुळे तो आश्रमाच्या गुरुकुलात सगळ्यांना हवाहवासा झाला.

कश्यप गुरूंचा तो मुलगा. त्याला तसाही मान मिळे. विनायकाने त्या परिस्थितीत संघटनेची कल्पना मांडली. 'नुसते शहाणपण आपल्याजवळ असून उपयोग नाही. ते व्यवहारात उपयोगात आणले पाहिजे. विद्या अर्थकारी हवी. सुशिक्षितांनी ध्येयाने जगावे. ते ध्येय व्यापक असावे. लोकांच्या, देशाच्या सेवेला ते लागावे,' अशा आपल्या कल्पना विनायकाने आपल्या विद्यार्थिबंधूंपुढे ठेवल्या.

मित्र– काही व्यावहारिक योजना आहे का तुझी?

विनायक– हो!

मित्र– बोल की मग!

विनायक– आपल्या गुरुकुलात एकवीसशे बटू आहेत. एकवीस एकविसाचे गट आपण पाडू. आपण सूर्योपासना करतोच. आता प्रत्येकाने त्रिशूळ हातात घ्यावा. त्याच्या फेकी शिकाव्यात. लढत कशी करायची व द्यायची ते शिकावे आणि त्याचे प्रयोगही करावेत. गायत्री मंत्र आपण जपतो, तसेच आपले शीलही जपावे. आपल्यापैकी कोणाकडेही जगाने पाहिले, तरी हा ऋषिवर्य कश्यपांच्या गुरुकुलातील आहे, हे चटकन पटले पाहिजे. रुचते हे तुम्हाला?

मित्र– न रुचायला काय झाले? चालू दे तुझे पुढे. आम्हाला सारी योजना समजू दे.

विनायक– हे पाहा, आपले शिक्षण समाजाला, राष्ट्राला, मानवजातीला उपयोगी पडले पाहिजे. तीच खरी देशसेवा. तेव्हा प्रथम आपण आपल्या देशाच्या संरक्षणापुरते झटू. एकवीस जणांच्या गटाचा नायक तो गणपती; एकवीस गणपतींचा मार्गदर्शक तो गणेश. एकवीस गणेशांना समजावील तो गणनायक; एकवीस गणनायकांना घेऊन धोरण ठरवील तो गणनाथ; एकवीस गणनाथांना बरोबर घेऊन वाटचाल नक्की करील तो गुणेश;

आणि एकवीस गुणेशांना घेऊन जो संघटनेचे एकसूत्र सांभाळील तो महागणपती अशी आपण संघटना बांधू या. करता का विचार?

मित्र– विचार कसला करायचा त्यात? तूच आमचा महागणपती. चांगल्या कामाला उशीर हवाच कशाला?

आणि लागले सारे मित्र कामाला. गुरुकुलात सगळ्यांना ती कल्पना आवडली. शिस्तबद्ध स्वयंसेवक सगळेच बटू बनले. कश्यपांच्या गुरुकुलातील या संघटनेचा प्रभाव पाहून इतरही गुरुकुले तशीच संघटना उभारू लागली.

## ४ : पाचवा वेदही झाला

वेदविद्या शिकून झाली. मग विनायक अमरावतीजवळ अश्विनीकुमारांच्या गुरुकुलात गेला. तेथे त्याला पाचवा वेद शिकावयाचा होता– तो आयुर्वेद. तेथील अभ्यास चालू असता, विनायकाने तेथेही आपली सूर्योपासना व विद्यार्थिसंघटना उभारली. जेथे जातो तेथे विनायक पुढारी व संघटक होतो हे ऐकल्यावर त्याच्या आईबापांच्या अंगावर मूठभर मांस चढे.

कश्यप हे रत्नपुरीच्या काशीराजाचे पुरोहित (डोळ्यांपुढे 'आदर्श' म्हणून ठेवलेले पुरुष) होते. त्यामुळे त्यांचा मुलगा शहाणा, शिकलेला व संघटक झालेला पाहून काशीराजालाही अभिमानच वाटू लागला.

आयुर्वेदाने विनायकास 'साध्याही विषयात आशय कधी मोठा किती आढळे।' हे कळून चुकले. बेल, तुळस, मंदार, आघाडा, शमी व विशेषतः दूर्वा यांचे गुण त्याच्या अनुभवास आले. आरोग्यासाठी निसर्गाचा प्रसादच त्या वनस्पती त्याला वाटल्या, म्हणून त्याने त्या मस्तकी धारण केल्या.

## ५ : वास्तववादी दृष्टिकोन

अठरा वर्षांचा विनायक विद्यासंपन्न झाला. मग त्याने आर्यावर्त हिंडावयाचे ठरविले. उत्तरध्रुवापासून विषुववृत्तापर्यंत असलेल्या एकवीस गणराज्यांत त्याने पायपीट केली.

*केल्याने देशाटण, पंडितमैत्री, सभेत संचार।*




*एक माजलेला हत्ती नरांतकाने विनायकावर सोडला.*

*शास्त्रग्रंथ-विलोकुन, मनुजा चातुर्य येतसे फार।।*

ते विनायकाला आले. भूत, पिशाच्च, नाग, गंधर्व, देव, मानव, यक्ष, किन्नर असे वेगवेगळे लोक वेगवेगळ्या गणराज्यांत होते. तरी त्या सगळ्यांची भाषा संस्कृत ही एकच होती; त्यांचे जीवनसंस्कारही थोड्याफार फरकाने एकच होते; आणि असे असूनही सर्वांची एकजूट नसल्यामुळे आर्यावर्ताबाहेरील राक्षसराज्याची जृम्भाराणी व तिचा मुलगा नरांतक याने आर्यावर्ताचा उभा छळ मांडला होता; हे सारे विनायकाच्या लक्षात आले.

कारण नरांतकाने या वेळी आर्यावर्तावर स्वारी करून सिंधुरपूर येथे आपली राजधानीसुद्धा स्थापली होती– आणि? काशीराजाचे पाताळ हे राज्य सोडून सगळीकडे आपले साम्राज्य स्थापले होते. नरांतकाच्या साम्राज्याचा राजपुत्र दन्तध्वज होता. तो विरोधकांवर कायमचा दात धरी!

नरांतकाने सूर्यमंदिरे नाहीशी करून तेथे जृम्भामंदिरे स्थापली. पहिल्या गोष्टीबद्दल विनायक चिडला; पण नरांतकाच्या मातृभक्तीबद्दल त्याला आदरच वाटला. विनायक खरा खवळला तो नरांतकाच्या निष्ठुरपणावर! 'साम्राज्यातील सर्व सुंदर तरुणींनी राक्षसांशी लग्ने केली पाहिजेत आणि प्रजेने कसलेही सोने म्हणून वापरता कामा नये; ते नरांतकाच्या सरकारी खजिन्यात भरले पाहिजे.' या नरांतकाच्या दंडकांनी विनायकाच्या अंगाचा तिळपापडच झाला.

मग विनायकाच्या डोक्याने घेतले, की आपली युवकांची सूर्योपासक गणसंघटना व्यवहारशुद्ध राष्ट्रसेवेस लावावी.

तो तयारीस लागला. राक्षसांना तोंड द्यावयाचे म्हणून अस्त्रविद्या संपादन करण्याचे त्याने मनावर घेतले. त्याची संघटनाही तेच करू लागली. दुर्बलपणे सामना करू नये; धीटपणाने करावा; असा त्यात विचार होता.

■

## ६ : पाशुपत विद्यालयात

भूतानमध्ये पाशुपत अस्त्रविद्यालयात सगळे विनायकाचे अनुयायी शिकत होते. ती तरबेजी मिळेपर्यंत आर्यावर्तात लोकमतही अनुकूल होत होते. लढाई नुसती रणांगणावर जिंकून चालत नाही. जिंकणाराच्या मागे लोकमत

असेल तरच विजय टिकाऊ ठरतो. म्हणून विविध अस्त्र-शस्त्रांचे हात जसे त्या पाशुपतविद्यालयात शिकवीत, तसेच शिस्त, ऐक्य, पावित्र्य, प्रेम आणि तेज यांचा सांभाळ आणि प्रचार कसा करावा, याचेही शिक्षण तेथे मिळे.

विनायकाने विद्यालयातील सगळ्या विद्या साध्य केल्या. आपल्या बरोबरीचा कोणताही विद्यार्थी पात्रता-प्रमाणात मागे पडू नये ही काळजी तो घेई. त्यामुळे तो सर्वांचा लाडका झाला, यात नवल काय! अहो, विद्यालयाचे प्रवर्तक आणि प्राचार्य भगवान शंकर विंनायकाला आपला मुलगाच मानू लागले. गुरुपत्नी उमादेवी. त्या नेहमीच आशीर्वाद द्यावयाच्या, 'सर्वत्र विजयी भव!' शंकर म्हणावयाचे, 'गुरूपेक्षा शिष्य व बापापेक्षा मुलगा सवाई होण्यात देशाचा जिवंतपणा असतो. तसे करून विद्यालयाचे नाव करा.'

■

## ७ : चळवळ व चुळबुळ; चवताळीही!

देशस्थिती पाहून जनसमूहाला शिक्षण देण्यासाठी विनायक आणि त्याचे एकवीसशे सहकारी देशभर हिंडले. नरांतकाने छळलेल्या, लुटलेल्या आणि 'असुनि जिवंतही मेले' करून टाकलेल्या माणसा-माणसांचे समाचार त्यांनी घेतले.

लोकमताचा पाठिंबा घेऊन विनायकाच्या सहकारी मंडळींनी मग नरांतकाच्या जुलमास तोंड देण्यास सुरुवात केली. नरांतकाचा अधिकारीवर्ग खाबूपासरी; विनायकाच्या संघटनेतून लोकसेवा होऊ लागताच, त्या अधिकारी मंडळींची तारांबळ उडू लागली. ते खवळले. नरांतकाचा मुख्य हेर धूम्राक्ष. त्याने साम्राज्यातील 'नवा उठाव' नरांतकाच्या कानी घातला. पाताळाचा राजा काशीराज रत्नपुरीत राहतो; त्याला व त्याच्या राज्याला अंकित केले पाहिजे; नाहीतर त्याच्या पुरोहिताचे पोर व त्या पोराची युवकसंघटना जृम्भासाम्राज्याचा नाश करील असा इशाराही धूम्राक्षाने दिला.

नरांतक मुळातच दंतध्वज! त्याने आता पाताळराज्य, विनायक आणि त्याची संघटना यांच्यावर चांगलाच दात धरला.

विनायकही कमी नव्हता. त्याने नरांतकाच्या राजधानीतील ऋद्धी व सिद्धी या दोन युवतींना एका जंगलात आश्रम काढून दिला. तेथून मुलींची त्रिशूळधारी संघटना बळकट होऊ लागली. आजच्या मुली म्हणजे उद्याच्या गृहलक्ष्मी व माता. त्या वीरश्रीने रसरसल्या की, राष्ट्र सतेज राहतेच. म्हणून आपल्या आठ सहकारी मैत्रिणी घेऊन ऋद्धिसिद्धींनी 'अंकुश गुरुकुल' चालविले. सिंधुरपुरातच असा शह आपल्याला बसला आहे, हे नरांतकाला कळले. धक्काच बसला त्याला!

आता तो जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी विनायकाचा व त्याच्या संघटनेचा संशय घेऊ लागला. राक्षसी लष्कराकडून त्याने आपले सारे साम्राज्य 'पक्का बंदोबस्त' करून जखडून टाकले.

विनायकाला कळून चुकले की, नरांतकाशी रणसंग्राम लवकरच घडणार, तेव्हा आपल्या आईवडिलांचा आशीर्वाद घेण्यासाठी तो कश्यपाश्रमात परतला.

■

## ८ : कपट पडले सपाट!

आईवडिलांचा आशीर्वाद घेऊन विनायक बद्रिकाश्रमात व्यासांचा आशीर्वाद घेण्यास निघाला. धूम्राक्ष पाळतीवर होताच. त्याने ती बातमी नरांतकाला दिली.

बद्रिकाश्रमाच्या वाटेवर एक दाट अरण्य होते. ताल, तमाल अशा उंच उंच झाडांनी ते दाटून भरलेले होते. सूर्याचा किरण तेथे जमिनीपर्यंत पोहोचू शकत नव्हता. त्या अरण्यातून विनायक जात राहील, त्या वेळी त्यास परलोकी पाठवावे, अशी योजना नरांतक करून बसला.

एक माजलेला हत्ती नरांतकाने विनायकावर सोडला. हत्ती चाल करून आला. ताबडतोब विनायकाने त्याच्यावर आपला पाश टाकला. हत्तीची सोंड आणि दोन पाय आवळले गेले. तरीही हत्ती मागच्या दोन पायांनी चाल करून मुसंडी मारण्यास आला. विनायकाने उडी मारून त्याच्या गंडस्थळावर त्रिशूळ मारला. हत्ती चीं चीं करीत चितपट झाला नि खलास झाला.

हत्तीच्या पाठीवर असलेले राक्षसांचे सैन्य मग सैरावैरा पळाले. अश्वमेधाचा घोडा अडविला की जसा पराभव, तसाच नरांतकाचा पराभव हत्तीच्या गतीने झाला!

■

## ९ : युद्धाला तोंड लागले!

नरांतकाने आता निश्चयच केला. विनायकाचे वडील कश्यप. त्यांचा आधार काशीराजा: त्या राजाचे पाताळ पादाक्रांत केले की विनायकाचा अन् त्याच्या संघटनेचा काटा काढता येईल.

बद्रिकाश्रमातून व्यासांचा आशीर्वाद घेऊन विनायक निघाला तो काशीराजाच्या मुलाच्या लग्नाला. त्या नरांतकाला ही बातमी लागली. त्याने वाटमारीसाठी विनायकावर राक्षससैन्य पाठविले. विनायकाची व काशीराजाची गाठ पडणे नरांतकाला इष्ट नव्हते.

राक्षस सैन्याने विनायकावर हल्ला केला. विनायकाच्या गण-पतींनी मोहनास्त्र सोडले. मग सारे राक्षस बेशुद्धच झाले नि अरण्यात निपचित लोळत पडले.

काशीराजाच्या कानी हे वृत्त गेले होते, म्हणून विनायक आपल्या गणसैन्यासह रत्नपुरीत येताच त्याचे स्वागत इतमामाने झाले. सम्राटांना हेवा वाटावा असे होते ते स्वागत.

विनायक सहपरिवार रत्नपुरीच्या सूर्यमंदिरात राहिला. तेथे ऋद्धिसिद्धींची वार्ताहर प्रकाम्या येऊन सांगू लागली, "देवा, नरांतकाचे वनवासी राक्षससैन्य शुद्धीवर आले आहे. त्यांचा नायक ज्वालामुखी याने नरांतकाला, झालेल्या आपल्या स्वागताचीसुद्धा बातमी दिली आहे. नरांतकाने ताबडतोब रत्नपुरीवरच हल्ला करण्यासाठी आवाज उठविला आहे."

एवढ्यात रणघंटाच ऐकू येऊ लागल्या. विनायक महागणपतीच होता. त्याने आपल्या सैन्यास इशारा करताच, त्यांच्याही रणदुंदुभी सुरू झाल्या. काशीराजाने सर्व साधनसामग्री पुरविण्याचे मनावर घेतले. लोकमताचा पाठिंबा विनायकाला होताच. म्हणून 'हर हर महादेव!' म्हणून विनायकाने खड्या झालेल्या नरांतकाशीच उघड सामना सुरू केला.

■



*नरांतकाने महाभयंकर त्रिशूळ फेकला*

## १० : विनायक एकदंत झाला!!

वीस दिवस हल्ले-प्रतिहल्ले चालू होते. पाताळाशिवाय नरांतकाच्या साम्राज्यात असलेल्या आर्यावर्ताच्या वीस राज्यांतून विनायकाला कुमक येत होती. त्यामुळे नरांतकाला घरी-दारी सगळीकडेच युद्धाचा प्रसंग होता.

नरांतक कावला; कातावला. युद्धाच्या एकविसाव्या दिवशी अगदी पहाटे नरांतक एका प्रचंड हत्तीवर स्वारी करून, विनायकाला चिरडून टाकण्यास आला. त्याचा दंतध्वज दिमाखाने फडकत होता. राक्षसांचे सैन्य खड्ग, शूल, गदा, मुसळ, बाण इत्यादी आयुधे चालवून आडवे येईल त्याला जमीनदोस्त करीत पुढे येत होते.

रक्ताचे पाट वाहू लागले. धरणी थरथरू लागली. कारण नरन्ताकाचा भाऊ, अगदी जुळा भाऊ देवांतक नरांतकाच्या मदतीस आला होता. अंगदेशातील रौद्रकेतूचाच तो मुलगा. नरांतकाने पृथ्वीवर धुमाकूळ घातला. तसाच देवांतकाने स्वर्गातल्या देवांना 'त्राहि भगवन' करून सोडले होते. तो देवांतक पुढे दिसला. विनायकाला चेव आला. खवळलाच तो! त्याने सिंहासारखी झडप घातली देवांतकावर. लोळवले त्याला आणि आपल्याच मांडीवर मुरगळले.

देवांतक तरी काय कमी वस्ताद? त्याने गणपती विनायकाच्या दोन दातांपैकी एकाला आवळले आपले दोन्ही हात! अधांतरी लोंबकळून झोके घेऊ लागला. परिणामी विनायकाचा दात मोडून पडला. त्या दाताबरोबर देवांतकही जमिनीवर आदळला. गणपती विनायकाने चपळाई केली. आपला मोडलेला दात आपल्या मुठीत घेऊन तो त्याने देवांतकाच्या टाळक्यात खुपसला. तुकडे, तुकडे, शेकडो तुकडे झाले देवांतकाच्या डोक्याचे.

आणि गणपती विनायक एकदन्त झाला.

■

## ११ : झाले! जीवनकार्य झाले!

विनायकाचा खरा सामना आता नरांतकाशीच व्हावयाचा होता. विनायकाला आता रणधुंदीच होती. नरांतकही भावाच्या मृत्यूने बेभान होऊन 'सूड!

सूड!!' अशा गर्जना करू लागला.

नरांतकाने महाभयंकर शूल महागणपती विनायकावर फेकला. विनायकाने तो मोडून पाडला. वेळ न लावता शंकरांनी दिलेला बाण त्याने नरांतकावर टाकला. तो सुवर्णभूषित होता, पण धूम्रयुक्त व नागासारखा तीव्र होता. पाशुपत धनुष्यास जोडून विनायकाने सोडलेला तो बाण! घुसला नरांतकाच्या छातीत!!

सूं सूं करीत आलेल्या त्या बाणाने नरांतक जमिनीवरच कोसळला. त्याबरोबर विनायकाने नरांतकाचे शिर जे भिरकावले ते जाऊन पडले रौद्रकेतूच्या वाड्यावर!!

तेथे केवढा तरी हाहाकार उडाला. पण पृथ्वी व स्वर्ग येथे आनंदीआनंद झाला. आर्यावर्तात परत अखंड गणराज्याची स्थापना झाली. काशीराजा त्या गणराज्यांचा लोकपाल झाला. महागणपती विनायक गणराज्यांचा सर-सेनापती झाला. अदिती-कश्यपांना आपल्या मुलाची कर्तव्यकीर्ती ऐकून धन्य धन्य झाले.

*'बाळ व्हावा ऐसा गुंडा। ज्याचा तिन्ही लोकी झेंडा!'*

■

## अवतार दुसरा

# १२ : गणाधीश तो ईश सर्वा गुणांचा

मैथिल देशातील गंडकी येथे राज्य करणारा चक्रपाणी आणि त्याची राणी उग्रा यांचा उग्रेक्षण हा मुलगा. सूर्योपासनेची सांगता होण्यापूर्वीच कृत्रिमपणाने ह्याचा जन्म करवावा लागला. याचे डोळे आईसारखे होते म्हणून याला उग्रेक्षण म्हणत. पण कृत्रिमपणाने आईच्या पोटातून आलेला हा मुलगा समुद्रात सोडून दिला, तरी एका दयावंताने तो फिरून आणून राजाला दिला. तेव्हा सिंधूने– समुद्राने– दिलेला मुलगा म्हणून सर्वजण त्यास सिंधू म्हणू लागले.

सिंधू मोठा झाला. हत्तीला चीत करण्याइतके सामर्थ्य त्याने कमावले. पुढे त्याने आपल्या आईबापांप्रमाणे सूर्याचीही उपासना केली. सूर्याने प्रसन्न होऊन त्याला एक अमृतपात्र दिले. ते कंठाशी आहे तोपर्यंत सिंधूला मृत्यू नाही, असा सूर्याचा त्याला वर होता. आपल्या मुलाची ही कर्तबगारी पाहून, चक्रपाणीने राज्य सिंधूच्या स्वाधीन केले आणि तो व उग्रा जगाच्या कटकटीपासून दूर गेले. सिंधू राजा झाला. सत्ता म्हणजे चांगुलपणा हे तो विसरला. राज्यातील सगळे काही मीच आहे असे त्याला वाटू लागले. ही त्याची उन्मत्तता एवढी फोफावली की तो कोणालाच विचारीनासा झाला. राज्यातील प्रत्येक वस्तू आणि व्यक्ती आपल्यासाठी राबली पाहिजे, असा त्याने दंडक सुरू केला. प्रजा कावली.

आपली प्रजा आपल्यावर रागावली आहे असे सिंधूला दिसले. त्याने त्यावर उपाय काढले. आपल्या राज्यातील तरुणांच्या राक्षसी पलटणी उभारून त्याने आपल्या राज्याचे साम्राज्य केले. भूतानपर्यंत त्याच्या स्वाऱ्या झाल्या. देवांचा देव महादेव. तोसुद्धा या राक्षसाला तोंड देण्यापेक्षा वनवास पत्करून बसला. अशुभ काळावर वा दैवावर मात करावयास साधनसामग्री व सामर्थ्य असावे लागते. ते कमी पडले तर काही काळ बगल देऊन थांबावे लागते. शंकरांनी तेच केले. सिंधू राक्षसाने विष्णूला स्थानबद्ध करून ठेवलेले त्यांनी पाहिले होते. म्हणून तशी नामुष्की शंकरांनी टाळली. त्यांनी भूतान सोडले व दक्षिणेतील त्रिसंध्या येथे वस्ती केली.

त्रिसंध्येतून सिंधू राक्षसाचा समाचार कसा घ्यावयाचा याचा शंकर व इतर देव आराखडा आखू लागले. देव आणि ऋषी यांनी आपल्या घरातील महिलामंडळींकडून होतकरू मुलांना वळण लावण्याची संघटना निर्माण केली. वीरगुणांनी तरुण पिढी संपन्न करण्याचा हा उद्योग जोराला लागला.

शिवपत्नी उमादेवी ही त्या देवर्षींच्या महिला संघटनेची प्रमुख होती. उपदेशापेक्षा उदाहरण सामाजिक मनास उठाव देते. म्हणून उमादेवींचा मुलगा गुणेश हा नावासारखा 'गुणांचा राजा' होता त्याला गणांचा म्हणजे समुदायाचाही नेता करावयाचे ठरविले.

■

## १३ : कुलदीप प्रकाशू लागला

गुणेशाचा जन्म भाद्रपद शुद्ध चतुर्थीचा, दोन प्रहरी, स्वाती नक्षत्रावर, सिंहलग्नावर सोमवारी तो झाला. तो सुखकर्ता, दुःखहर्ता होईल व विघ्नांची वार्ता उरू देणार नाही, असे भविष्य भल्याभल्या ऋषींनी वर्तविले.

पार्वतीचा म्हणजेच उमादेवींचा गुणेश उफाड्याने वाढू लागला. लहानपणीच त्याचा मोठेपणा लोकांना पटू लागला. त्याच्या गुणांवरून त्याचे आजोबा हिमनगराज त्याला 'हेरंब' म्हणत. पार्वती त्याच नावाने त्याला हाक मारी. विश्वकर्मा या कारागिराकडून गुणेशास पार्वतीने शस्त्रास्त्रविद्येचे शिक्षण देवविले. अंकुश, परशु, पाश व पद्म चालविण्यात व हाताळण्यात गुणेश तरबेज झाला. 'दुष्टांचा नाश करावा व सज्जनांचा सांभाळ करावा यासाठीच मी शस्त्रास्त्रविद्येचा उपयोग करीन' अशी शपथही गुणेशाने विश्वकर्म्याजवळ घेतली. फार काय, विश्वकर्म्याला स्वदेशी जाण्यास शंकर-पार्वतींनी निरोप देण्यापूर्वीच बुक आदी राक्षसांचा गुणेशाने फडशा पाडून दाखविला.

शंकरांनी गौतमऋषींना बोलावून गुणेशाची सातव्या वर्षी मोठ्या थाटाने मुंज केली. सर्व ऋषिगणांचे आशीर्वाद गुणेशाला चालू असताच, त्या सर्व समारंभावरच सिंधू राक्षसाने कृतान्त व काळ असे दोन मत्त हत्ती घातले. गोंधळ उडाला. शिवगणांनी हत्तींना आवरण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ गेला. तेव्हा गुणेशाला राहवेना. तो सरळ सरसावला. आणि. . .

त्याने हत्तींना सोंडेवर असे तडाखे लगावले की हत्तीच 'चीं चीं' करीत मागे सरले. संधी साधून गुणेशाने त्यांना एकमेकांवर घातले. तसे ते दोघेही नाश पावले. मग गुणेशाची मुंज यथासांग पार पडली.

भिक्षावळीत गुणेशाला आईकडून मोत्याचा कंठा, शंकराकडून त्रिशूळ, हरीकडून चक्र अशा देणग्या मिळाल्या. गौतमांनी घालून दिलेली ब्रह्मचर्याश्रमाची शिस्त गुणेश पाळी. चारही वेदांप्रमाणेच धनुर्वेद, आयुर्वेद, गांधर्ववेद गुणेशाने शिकून घेतले. शिक्षण चालू असताही, गुणेशाने नागलोकावर स्वारी करून कश्यपऋषींच्या व विनतादेवीच्या मुलास सोडवून आणले.

विद्या ध्येयवादी आणि लोकांना स्वातंत्र्य देणारी हवी, हे गुणेशाने पटविले तेव्हा शंकरांनी दंडकारण्यातील त्रिसंध्येमधून आपला मुक्काम हलवण्याचे ठरवले.




*गुणेशाला आईकडून मोत्याचा कंठा मिळाला*

विद्यार्थी असतानाच नागलोकांचा पराभव करणाऱ्या गुणेशाची भीती सिंधू वगैरे राक्षसांना वाटू लागली होती. म्हणून सिंधू राक्षसाने भूतानच्या अर्ध्या वाटेवरच कमलासुर या आपल्या हस्तकाकडून वाटमारी करण्याचे ठरवले.

कमलासुर व गुणेश यांची गाठ पडताच, शस्त्राला शस्त्रे भिडलीच की मग! शिवगणांनी शिकस्त केली. बारा-तेरा वर्षांचा गुणेश! रणधुमाळीत तो गनिमी काव्याने लढला. म्हणून त्याचा अफाट राक्षसी सेनेशी लढताना निभाव लागला. कमलासुराचे सैन्य सैरावैरा पळू लागले. कमलासुर मग त्वेषाने गुणेशावरच चालून आला. गुणेशाने निकराने हल्ला केला. एकापेक्षा एक असे शंकराचे व गुणेशाचे गण आपल्यावर तुटून पडलेले पाहताच, कमलासुरास पळता भुई थोडी झाली. गुणेशाने त्यास घेरले. तोही जिवावर उदार होऊन लढला. कृष्णा व भीमा या दोन नद्यांच्या मध्यभूमीवर झालेल्या युद्धात गुणेशाच्या शस्त्राने कमलासुराचे मस्तक तुटून पडले.

लोककल्याणाचे आपले व्रत आपला मुलगा पुढे चालवतो आहे, हे पाहून शंकर-पार्वती यांना तर आनंद झालाच, पण सर्व लोकांनाही आपला तारणहार मिळाल्याचा संतोष झाला.

■

## १४ : आधी विजयलक्ष्मी, मग गृहलक्ष्मी

कृष्णा व भीमा यांच्या मध्यभूमीवर मिळवलेला विजय मयूरसैन्यबलावर गुणेशाने मिळवला होता. तो विजय स्थिर करण्यासाठी शंकर-पार्वतीसह गुणेश विजयभूमीवरच ठाण देऊन राहिला. आपल्या लोककल्याणकारी शासन-शिक्षण– व्यवस्थेने गुणेश एवढा लोकमान्य झाला की, लोक त्याला मयूरेश, मोरेश्वर म्हणू लागले.

शंकर-पार्वती आता गुणेशाच्या विवाहाचा विचार करू लागली. नारदमुनींच्या मार्फत ब्रह्मदेवांनी आपली मुलगी सांगून पाठवली. शंकर-पार्वतींना हा योग पसंत पडला. ब्रह्मदेवाच्याकडे जाण्यास वराकडील वऱ्हाडी निघाले.

शंकर आपल्या गणांसह चाललेले पाहून सिंधूराक्षसाच्या 'पक्क्या

बंदोबस्तास' उबळ आली. सिंधूसम्राटाच्या आज्ञेशिवाय शंकरप्रभृतींना पुढे जाता येणार नाही, असे राक्षस-सेनापतीने बजावले.

मयूरेश गुणेश पुढे झाला. तो उत्तरला, "तुम्ही आम्हाला ओळखले नाहीत. आम्ही स्वतंत्र आहोत. राक्षसांचा शेवट करून साधूंचे रक्षण करणे हे ब्रीद! (वयं स्वतंत्रा, अन्तका दैत्यरक्षसां, साधुपालकाः।) आम्ही आमच्या मार्गानेच जाणार, आम्ही या देशाचे रहिवासी. आम्हालाच तुम्ही उपऱ्या राक्षसांनी अडवायचे व हुकूम करायचे? चालणार नाही हे! याहीवर मग्रुरी कराल, तर तुमचा समाचार कसा घ्यावयाचा ते आम्ही पाहून घेऊ."

राक्षस का गुणेशाचे बोलणे ऐकून घेतील? त्यांच्यापैकी हेम आपल्या दळासह पुढे आला. गुणेशाच्या ऋषिकुमारांनी हेमावर व त्याच्या दळावर दर्भास्त्रांचा मारा केला. राक्षसांच्या नाकातोंडात, कानाडोळ्यांत दर्भ घुसले रे घुसले की ते राक्षस गुदमरून खालीच पडले! नरनारायणऋषींच्या नंतर दर्भास्त्राचा प्रभाव दाखवणारा गुणेश अजोड ठरला!

मग गुणेश, त्याचे सैन्य, त्याच्यामागून शंकर-पार्वती नि त्यांच्या मागून सारे गण चालू लागले. सर्व मंडळी गंडकी नगराजवळ आली. तेव्हा गुणेश म्हणाला, "लोक हो, तुम्ही माझ्या लग्नासाठी आला आहात. पण संसार करायचा, तर शांती नको का? सिंधू राक्षसाने देवांस पादाक्रांत करून कारावासात ठेवले आहे, काहींना स्थानबद्ध केले आहे, काही रानावनात लपूनछपून आहेत. त्या सर्वांना अगोदर मोकळे नको का करायला? आधी आणू विजयलक्ष्मी आणि मग पाहू गृहलक्ष्मी."

गुणेशाच्या या लोककल्याणी वृत्तीचे सर्वांनी स्वागत केले. सर्वांच्या मताने सिंधू राक्षसाकडे राजदूत म्हणून पाठविण्यास नंदिकेश्वराची निवड झाली. समुद्रासारखा गंभीर, पर्वतासारखा धीराचा, बृहस्पतीसारखा बुद्धिमान, इंद्रासारखा सामर्थ्यवान आणि नारदासारखा दुसऱ्याचा ठाव घेणारा असा तो नंदिकेश्वर होता.

सिंधुराक्षस सम्राटाच्या दरबारात नंदिकेश्वर गेला. आपण भूतानेश्वर शंकराचे राजदूत आहोत, अशी त्याने आपली ओळखही दिली. 'सर्व देवांना बंधमुक्त करून त्यांचे अधिकार त्यांच्या त्यांच्या देशावर चालविण्याची प्रतिष्ठा त्यांना मिळाली पाहिजे.' असा गुणेशाचा आदेशही नंदिकेश्वराने सिंधूस सांगितला. तेव्हा सिंधू उत्तरला, "खड्गाच्या जोरावर मी मिळविलेले

साम्राज्य शब्दांच्या जोरावर परत मिळेल, हे तुझ्या त्या गुणेश युवराजाला वाटले तरी कसे? खड्गाच्या खणखणाटात आमचा खडखडाटच झाला, तरच देव स्वतंत्र होऊ शकतील, एरवी नाही. आमचा हा निश्चय तू आपल्या छोट्या-मोठ्या धन्याला सांग.''

नंदिकेश्वर या उत्तराने खवळला. तरी एवढेच म्हणाला, ''होणारे चुकणारच नसले, तर तुला तरी अशी बुद्धी का होती?'' नंदिकेश्वराने आपली शिष्टाई सांगितली. गुणेशाला आनंद झाला. जशास तसे, या न्यायाने गुणेशाने आपल्या सैन्याची सज्ज तयारी केली. गंडकी शहराजवळ चकमकी सुरू झाल्या.

गुणेशाच्या शिस्तबद्ध सैनिकांनी सिंधू सम्राटाच्या सैन्याला चांगलेच गारद केले. मूठभर वाचलेले लोक जीव मुठीत घेऊन सिंधूजवळ आपल्या पराभवाचा पाढा वाचू लागले. सिंधूचा पारा चढत चालला. सिंधू पुढाकार घेऊन युद्धास निघाला.

■

## १५ : विजयलक्ष्मीचा संसार

गंडकी नगरीच्या बाहेर सिंधुराक्षसाचे सैन्य ताज्या दमाने येऊ लागले. गुणेशाचे लोक टपलेच होते. दोनही बाजूंचे वीर कामास येऊ लागले. सायंकाळच्या सुमारास सिंधू राक्षसाचे छत्र तुटले; घोडा मारला गेला. लगेच त्याच्या बाजूने कौस्तुभ व मेष हे दोघे अमात्य गुणेशाच्या हल्लेखोराशी भिडले.

कौस्तुभ-मेषांच्या युद्धकौशल्याने भूतनाथाचे सैन्य म्हणजे शिवगण मागचा पाय घेऊ लागले, तेव्हा वीरभद्र व षडानन यांना राहवेना. त्यांनी खूप शर्थीने गुणेशाची सरशी राखण्याचा प्रयत्न केला, पण यश राक्षसांच्या बाजूला आले.

तेव्हा षडानन आणि वीरभद्र पुन्हा उसळून उठले. त्यांनी विजयांध राक्षस-प्रमुखावर उभ्या उभ्या चाल केली. त्यांनी सिंधू राक्षसाचे कौस्तुभ व मेष या सेनानींस यमसदनास पाठविले. तथापि श्रमातिरेकाने षडाननास मूर्च्छा आली. तरीही आपल्या थोरल्या भावाच्या प्रयत्नास यश मिळवून

देण्यासाठी गुणेश पुढे होऊन राक्षस सैन्याशी निकराने लढतच राहिला आणि मध्यरात्रीच्या सुमारास राक्षस सैन्याची धूळधाण उडवून विजयी झाला.

कशी झोप येणार सिंधूला? त्याला चैन तरी कसे पडणार? दुसऱ्या दिवशी सकाळीच घोड्यावर स्वार होऊन आणि नव्या दमाची कर्तृत्ववान मंडळी घेऊन, सिंधूने स्वतः गुणेशाशीच घनचक्कर लढाई मांडली. शिवसैन्यापैकी नंदिकेश्वर, पुष्पदंत, वीरभद्र, षडानन आपापल्या आघाड्या दक्षतेने सांभाळून गुणेशाला अभिरक्षण देऊ लागले.

दोन दिवस तुंबळ युद्ध झाले. आणि त्या आणीबाणीच्या धुमश्चक्रीत सिंधू दैत्याचा सपशेल पराभव झाला. म्हणून तो काही शरणागतीची भाषा करील की काय ? तो जमिनीवर आपटलेल्या चेंडूसारखा पुन्हा उफाळून उलटला. गुणेश व त्याचे सैन्य यांच्याशीच त्याने आता उघड उघड सामना मांडला! धुळीने दशदिशा व्यापून गेल्या, वीरभद्र मूर्च्छित पडला; नंदिकेश्वरला मस्तकी जबर जखम झाली; पुष्पदंताचे पोटच फाटले; कित्येक तरी वीर जखमांनी नखशिखांत न्हाले. पण एकानेही आपले कर्तव्य सोडले नाही! आता स्वतः गुणेशालाच सिंधूने घेरले, गुंडाळले, वेढले, छेडले, चोपले. तेवढ्यानेही शंकराचा पोर नमत, वरमत वा मरत नाही, हे पाहिल्यावर आपल्या युद्धकौशल्याची पराकाष्ठा करून सिंधू गुणेशाचे 'एक घाव दोन तुकडे' करण्याच्या उद्योगास लागला. 'जैशास तैसा जेव्हा भेटे। तेव्हा मजालसी थाटे॥' या वचनाचा प्रत्यय गुणेशानेही आणून दिला. गुणेशाने 'अंकुशाचा मार' करून सिंधूचे कान धडावेगळे केले. सिंधू भ्रमला. 'हरक्षणि पडे, उठे, फिरूनि मारण्याही झटे॥' असे थेर तो करू लागला. शेवटी गुणेशाने सिंधूच्या हृदयावर असा प्रहार केला की, त्याच्या कंठीचा अमृतकुंभ फुटला व कोठच्या कोठे वाहून गेला!!!

गुणेशाच्या सैन्यात जयसूचक वाद्ये झडली. शंकर-पार्वतीसह सर्व देवपक्षीयांनी गुणेशाचा जयजयकार केला. सामान्य जनगणांनी तर तो 'देव मस्तकी धरला.' सिंधूच्या गंडकीत शोकरसाचे पूर वाहिले. तेव्हा गुणेशाने तेथे जाऊन सर्वांना समजाविले व सांत्वन केले. इंद्रादी सर्व देवांस गुणेशाने बंधमुक्त केले. विष्णूसुद्धा सर्व देव मोकळेपणाने आपले आपले लोकसेवेचे कार्य पूर्ववत करू लागले.

गुणेशाच्या या दिग्विजयाने सर्वत्र आनंदीआनंदी पसरल्यावरच मग गुणेशाच्या विवाह समारंभास सर्वजण उत्साहाने जाण्यास निघाले.

ब्रह्मदेवानेही 'उत्सव बहु थोर करीत' आपल्या मुलींचा सोहळा थाटला. सुमुहूर्तावर विधिपूर्वक मयूरेश-गुणेशाचा विवाह झाला. निर्माणदेवाच्या–ब्रह्मदेवाच्या–सिद्धी व बुद्धी या दोन्ही कन्या गुणेशाच्या घरधणिनी झाल्या. जेथे गुणेशाने दिग्विजय केला होता, त्या गंडकी नगरीतच गुणेशाने गणाधीश होऊन आपला संसार थाटला.

राज्याची सर्व व्यवस्था लावली. देव आपापल्या जागेवरून आर्यावर्ताचा कारभार कर्तव्यनिष्ठेने करू लागले. पृथ्वीवर अन्याय म्हणून कसा तो उरला नाही. सर्वजण उचित धर्माचरण करीत राहिले.

आपल्याला जे करावयाचे होते ते केले. मिळवावयाचे होते ते मिळवले आणि कीर्तिरूपाने आपले नावही करून ठेवले, असा पक्का आढळ झाल्यावर गुणेशाने सर्वांचा निरोप मागितला.

जड अंतःकरणाने त्या 'निश्चयाच्या महादेवा' ला सर्वांनी निरोप दिला. पण त्याचा आदर्श जगाच्या पुढे राहावा म्हणून त्याचे मंदिर बांधण्यात आले व त्याची गुणपूजा नियमाने सुरू झाली.

■

# अवतार तिसरा

## १६ : विषाची परीक्षा

जृंभा राक्षसीचा मुलगा सिंदुरासुर. गोरागोमटा व धट्टाकट्टा. त्याने ब्रह्मदेवाकडून वर मिळवला– 'सिंदूर ज्याला आलिंगन देईल तो मरेल!' ब्रह्मदेवाचा वर खरा कशावरून? त्याचा पडताळा पाहण्यासाठी सिंदुराने ब्रह्मदेवावरच प्रयोग करण्याचे ठरविले. खाल्ल्याघरचे वासे तो मोजायला लागला. या कृतघ्नतेला काय म्हणावे? 'हासत कर्म करावे, भोगावे रडत तेच परिणामी।' असे म्हणण्याची ब्रह्मदेवावर पाळी आली. शील न पाहता विद्या किंवा वर दिला, तर ज्याची विद्या त्याच्यावरच उलटते.




*गुणेशाने सिंधूच्या हृदयावर प्रहार केला*

ब्रह्मदेवाला पळता पळता नाकी नऊ आले. तो नारायणाकडे गेला. पाठीवर पळत सुटलेला सिंदुरासुर होताच! नारायणदेवाच्या लक्षात सर्व प्रकार आल्यावर तो सिंदुराला म्हणाला, "जवान, तुला कुस्तीच करायची असली तर भगवान शंकराशी कर. अरे, तोडीच्या पहिलवानाशी लढून बिनतोड ठर! ब्रह्मदेव काय, किंवा मी काय, खिळखिळलेली खोकी आम्ही, आम्हाला मोडण्यात तुझा काय पराक्रम ?"

सिंदुर तेथून मग कैलासात गेला. शंकर ध्यानस्थ होते. त्यांना चिडविण्यासाठी सिंदुराने हरतऱ्हा केल्या. शंकराची समाधी ढळेना. तेव्हा त्याने पार्वतीची वेणी धरून तिला पळवले, तेव्हा शिवगणांनी आरडओरड केली. पार्वती किंचाळली. शंकराची समाधी उतरली. सर्व प्रकार समजल्यावर ते ताडकन सिंदुराचा पाठलागच करू लागले. त्यांनी सिंदुराला गाठले. झटापट करून प्रथम पार्वतीला त्यांनी सोडवले.

सिंदुर मग शंकरांच्यावर चाल करूनच आला. दोघांचे बाहुयुद्ध झाले. दोघांचे उलटसुलट डावपेच झाले. शेवटी आडदांड सिंदुराला मातीत लोळवून शंकरांनी त्याच्या टाळक्यात असा त्रिशूळ मारला की तो रक्त ओकू लागून मूर्च्छित पडला.

शंकर आपल्या धर्मपत्नीस घेऊन स्वस्थानी आले.

शंकरांनी मातीत लोळविलेला सिंदुरासुर आर्यावर्तात उतरला. आडदांडपणाने त्याने धनिक लुटले, राज्ये बळकावली, छप्पन राजांवर 'फोडा व झोडा' या नीतीने जरब बसवून आपले साम्राज्य स्थापले. सत्तांध होऊन तो मुनी, तपस्वी, योगी यांचा छळ करू लागला. देवमंदिरांचा विध्वंस मांडून सर्व साम्राज्यभर त्याने जृंभापूजा प्रचलित केली.

आर्यावर्तातील देव व मानव चिंतातुर झाले. जुलूमशाहीतून बाहेर पडण्याचा ते विचार करू लागले. एका निबिड अरण्यात आपली परिषद घेऊन, ते या निर्णयाला आले की विघ्नहर विनायक गणपतीला शरण जावे. देवगुरू बृहस्पतीने ही युक्ती सुचवली. सर्व देवमानव तसे करू लागले. शंकरांनी पार्वतीस डोहाळे लागल्यामुळे निसर्गसुंदर परळीस (पर्यली) नेऊन ठेवले होते. तिच्या पोटी आपण नवा अवतार घेत आहोत, असा विनायकाने देवमानवांना दृष्टांत दिला.

■

## १७ : रूपापेक्षा गुण लागतात

पार्वतीला मुलगा झाला. त्याला हत्तीच्या सोंडेसारखे नाक होते! त्याचे डोळे बारीक होते. पाय आखूड, पोट मोठे, डोके ओबड-धोबड!

पण शंकरांनी व ज्योतिषांनी त्या मुलाचे जातक वर्तवले. 'हा मुलगा मोठा प्रतापी व दिग्विजयी होणार; याला राजयोग आहेत. हा सर्व लोकांचे दुःख दूर करून दुष्टांचा नाश करील, सज्जनांचे रक्षण करील.' पण पार्वतीला बाळाचे रूप काही रुचेना!

तेव्हा शंकरांनी माहिष्मती नगरात वरेण्य राजा राज्य करीत होता, त्याच्याकडे आपल्या मुलास पोहोचविले. त्याची सात्त्विक पत्नी पुष्पिका. ती शंकराच्या मुलाचे संगोपन करू लागली. ती त्याला आपलाच मुलगा समजे.

कारणही तसेच होते. पुष्पिका बाळंत झाल्याबरोबर तिचा मुलगा सिंदुरासुराच्या राक्षसांनी लांबविला होता. तिला बेशुद्ध करूनच राक्षसांनी तो प्रकार केला होता. एवढ्यात शंकरांनी आपला पोर वरेण्याच्या संगनमताने तिच्यापुढे नेऊन निजवला होता. शुद्धीवर आल्यावर खरा प्रकार समजून ती वेडी झाली असती! ती या मुलाला पाहून त्याला आपल्या उराशी घट्ट धरून बसली. काही वेळाने पुष्पिकेने व तिच्या दासींनी त्या मुलाचे रूप न्याहाळले! तेव्हा सगळीच दचकली. राजा वरेण्यापर्यंत ते सर्व वर्तमान गेले. तेव्हा सर्वांनी मिळून ठरविले की, हे कुरूप बालक अरण्यात टाकून द्यावे!

तेथे काय उशीर? राजाचा हुकूम झाला. बालक वनवासी झाले. काही लांडगे, काही वाघ त्या बालकाजवळ येऊन हुंगू लागले. लवकरच त्यांच्यात गुरगुरी, कुरकुरी सुरू झाल्या. ते एकमेकांवर तुटून पडता पडता एकमेकांचा पाडाव करण्याच्या ईर्ष्येने त्या बालकापासून जरा दूर अंतरावर सरकले. इतक्यात भगवान पाराशर ऋषी समिधा तोडण्यासाठी अरण्यात आले होते, त्यांना ते बालक दिसले. ऋषींचे वात्सल्य जागे झाले. त्यांनी त्या बाळाला काखेत मारून आपल्या आश्रमात आणले.

आश्रमात आल्यावर त्या बाळाची सामुद्रिक चिन्हे पाराशरांनी पाहिली. अवतारी पुरुषाची ती चिन्हे आढळली!

पाराशरांनी त्या बाळास आपली पत्नी वत्सला हिच्या स्वाधीन केले. वत्सलेस अपूर्व आनंद झाला. ते बाळही हसले.

पाराशरांच्या आश्रमात ते बाळ वाढू लागले. ते मुले जमवून खेळूबागडू लागले. त्याच्या तशा प्रवृत्तीवरून वत्सला-पाराशर त्यास गणेश वा गणपती म्हणू लागले.

अनेक यात्रेकरूंनी वरेण्यराजाच्या कानावर गणपतीची हकीगत घातली, तेव्हा आपण अरण्यात सोडलेलाच तो मुलगा याची राजाने खात्री करून घेतली. गणेशाचे गुण व प्रगती ऐकून आपलाच मुलगा पाराशरांच्या आश्रमात तयार होत आहे, असे राजाने जाहीर करून राज्यभर साखर वाटली.

टाकून दिलेले मूल सद्‌गुणी आणि कर्ते निघाले की ते आपले असल्याचे राजा सांगू लागल्याबरोबर प्रजाही तसेच करू लागली. उगवत्या सूर्याला सारेच नमस्कार करतात.

■

## १८ : प्रयत्न-पुरुषार्थ प्रभावी ठरले

इकडे सिंदुरासुर समजून चुकला होता की आपण निर्वैरी आहोत. 'सत्ताबले दास करि जो त्रिलोकास, त्याही कृतान्तास नमवीन पायी।।' असे आपले सामर्थ्य आहे. आपल्यापेक्षा वरचढ कोणी होऊ नये याची तो काळजी घेतच होता. 'पराधिकपणे मत्सरू' हा त्याचा स्वभावच बनला होता. म्हणून नवीन मुलांत कोणी चलाख, आगळा दिसला की त्याचा बळी घ्यावयास तो कमी करीत नसे. एका सत्पुरुषास सिंदुरासुर नाहक छळत असता, त्या सत्पुरुषाने त्यास स्पष्टच बजावले की, "तुझा काळ जन्मास आला आहे. आम्ही तुझा छळ सोसतो, मरणही पत्करतो, पण ते केवळ तुझ्या पापाचा घडा भरावा म्हणून!"

पाराशरांच्या आश्रमात विद्या शिकत असता गणेश, सिंदुरासुराचे अत्याचार, अनाचार व अविचार ऐकतच होता. गणेशाचे मन खळबळे. सिंदुरासुराचे राक्षसी चाळे त्याने एके दिवशी इतके ऐकले की तो बेचैन झाला. एकदम पाराशर ऋषींपुढे जाऊन तो म्हणाला, "भगवन्! सिंदुरासुराचे भयानक चाळे आता ऐकवतदेखील नाहीत! शरीरातील रक्त कढलेल्या तेलासारखे




*'ठेवले रे बाबा' हे शिवलिंगाचे ओझे खाली!*

उकळ्या, उसळ्या मारू लागते. तेव्हा मला आज्ञा द्या, या सिंदुरासुराचा समाचार घेण्याची.''

पाराशर मनातून आनंदले; मनापासून हसले; म्हणाले, ''गणेशा, तुझी जिद्द चांगलीच आहे. पण सिंदुरासुराची संघटना राक्षसी व बलवान आहे. अपुऱ्या तयारीने देवही त्याला तोंड देऊ शकत नाहीत. मग एकाकी तू कसा पुरा पडणार?''

गणेश म्हणाला, ''बाप्पा, आपला आशीर्वाद माझ्या मस्तकी असू दे. मी सिंदुरासुराला ताळ्यावर तरी आणीन, नाहीतर त्याचा शेवट तरी करीन. यांपैकी एकही गोष्ट न साधेल, तर आपण दिलेल्या शिक्षणाला मी बट्टा लावला म्हणून फिरून आपल्याला तोंडही दाखविणार नाही.''

पाराशरांनी आशीर्वाद दिला. गणेशाला सुचविले की, आत्मविश्वास आणि दृढनिश्चय यांच्या जोरावर केलेला प्रयत्न-पुरुषार्थ प्रभावीच ठरेल.

पाराशरांचा आशीर्वाद म्हणजे गुरुप्रसाद. तो मिळाल्यावर गणेशाला कमालीची उमेद आली. गणेश मग घृणेश्वराजवळील सिंदुरवाडच्या उत्तरेस येऊन आपला तळ देऊन बसला.

हा बुद्धिबळाने शह देण्याचा डाव होता. सिंदुरवाड या आपल्या राजधानीतूनच सिंदुरासुर सगळे उपद्व्याप नि उलथापालथी करीत नव्हता का? गणेशाने इतक्या जवळ तळ दिला हे पाहून सिंदुर व त्याचे साथी बावचळलेच!

गणेश आणि सिंदुर एकमेकांच्या हालचाली टेहळू लागले.

आणि एके दिवशी गणेशाने सरळच सिंदुरास निरोप पाठविला की, ''मी शंकरांचा मुलगा; वरेण्य राजाचा कृतक; पाराशरांचा विनीत; सज्जनांचे रक्षण आणि दुर्जनांचे निर्दाळण हे माझे जीवितकार्य. तू दुसऱ्या पंखी आहेस. तुला सांगून-सवरून तू शुद्धीवर येत नाहीस, तर मी तुझ्यावर आता केव्हा छापा घालीन याचा नेम नाही. लोकांनी हाल सोसावेत आणि तुला एक दिवस तरी पश्चात्ताप होईल अशी दैवाची वाट पाहावी, या शबल सत्याग्रहाचे प्रयोजन आता नाही. माझा आता शुद्ध सत्याग्रह मी सुरू करणार आहे. तुला सावध करीत आहे. अजूनही शुद्धीवर आल्याची [illegible] पटविलीस तर ठीक. नाहीतर ज्याचे नशीब त्याच्या मनगटावर हे ठरलेलेच आहे.''

गणेशाचा हा धीट निरोप ऐकूनच सिंदुराला धडकी भरली. पण दरबारी म्हणाले, "किती लहान तोंडी मोठा घास घेऊ पाहते आहे, हे पोर!"

लगेच सिंदुर म्हणाला, "वये थोर ते चोर होवोनि ठेले। कांय? होऊन जाऊ द्या दोन हात!"

सिंदुरासुराच्या सेनापतींनीही साथ दिली. 'लाख मरोत पण लाखांचा पोशिंदा न मरो' अशी ग्वाही त्यांनी दिली.

मग काय? सिंदुरासुर चढलाच हरबऱ्याच्या झाडावर! तो म्हणाला, "आहेच काय मुळी हे शंकराचे पोर?"–आणि? एकदम सिंदुरासुर थेट गणेशापर्यंत पोहोचलासुद्धा!

गाठ पडताच सिंदुर गणेशाला म्हणाला–"तू का माझ्याबरोबर लढणार? चिमटीत दामटले तर फुकट मरशील माझ्या हातून! तुझ्याशी मी युद्ध खेळतो, हे जगाने ऐकले तर जग मला हसेल!"

त्यावर गणेश उत्तरला, "खरेच आहे ते! जगाला चांगले कळते, कुणी कुणाशी सामना केल्याने कुणाला कमीपणा येईल ते!"

पण ही शब्दाशब्दी तितकीच राहिली. सिंदुरासुर लगेच मुद्द्यावरून गुद्द्यावर आला. थोडा वेळ गुद्दागुद्दी होता होता दोघांत द्वंद्वयुद्धच सुरू झाले.

एकमेकांनी एकमेकांची रग जिरवण्याची पराकाष्ठा केली. सिंदुरासुर व गणपती यांची लढत झाली. सिंदुराने फेकले गणपतीला नर्मदेत. गणपती रक्तबंबाळ झाला. नर्मदा लाल लाल झाली! गणपती उसळून उठला, उलटला आणि त्याने सिंदुरासुराला लोळवण्यासाठी डावच डाव केले. त्या डावांत सिंदुरासुराचे रक्त गणेशाच्या अंगास लागत गेले! त्याच्या वासाने व रंगाने गणपतीचे अंगही शेंदूर लावल्यासारखे दिसू लागले. शत्रूच्या रक्ताचा टिळा, शत्रूला मारून आलेला वीर, आपल्या कपाळी लावून येत असे; त्या काळात तर ते भूषण मानले जाई. लढत होऊन गणेशाने सिंदुरासुराला ठार मारल्यावर, त्याच्या रक्ताने माखला गेला होता गणेश! मग लोक साहजिकच गणेशाला 'सिंदुरप्रिय, सिंदुराङ्ग, सिंदुरवदन' असे संबोधू लागले.

विजय मिळताच गणेशाने सिंदुरासुराच्या बंदिशाळेतील सर्व देवांना मोकळे केले. ज्याच्या त्याच्या पात्रता-सिद्धीप्रमाणे ज्याच्या त्याच्याकडे कामे

सोपविली. सर्वत्र शांती नांदू लागली. राजा वरेण्य मग गणेशास भेटला. वनात आपण गणेशाला सोडून दिल्याची आठवण काढून रडू लागला. गणेशाने राजाला आलिंगन देऊन वंदन केले आणि सांगितले, "झाले गेले विसरून जाऊ या."

वरेण्य म्हणाला, "खरा शंकराचा सुपुत्र तू. जीवनाचे सार्थक करण्याचे ज्ञान मला देशील का?"

"का नाही देणार!" असे उत्तरून गणेशाने वरेण्याला जो उपदेश केला, तीच 'गणेशगीता' म्हणून जगात अमर होऊन राहिली. तिचे प्रबोधन आहे हे:-

"स्वस्वकर्मरता लोका ईश्वरार्पणकारिणः।
सुप्रसादात्स्थिरं स्थानं यान्ति ते परमं सदा॥"

■

## अवतार चौथा

## १९ : युक्तीने कार्य होतसे

हिमालयावर अभिनंदन नावाचा राजा यज्ञ करीत होता. त्याचा विध्वंस विघ्नासुर करू लागला, तेव्हा सारे देव गणपतीकडे धावले. मग गणपती पार्श्वपुत्र झाला. एखाद्या लाडक्या मुलासारखा तो विघ्नासुराच्या पाठीमागे लागला. अन्? एके दिवशी विघ्नासुराला पार्श्वपुत्राने धरून ठेवले. त्याची ताकद अनुभवून विघ्नासुर शरण आला. गयावया करून तो पार्श्व पुत्राच्या ऊर्फ गणपतीच्या भजनीच लागला. मग गणपतीने त्याला आपल्या मंडळातच घेतले, तेव्हा गणपतीला 'विघ्नराज' म्हणजे विघ्नावर सत्ता चालविणारा असे लोक म्हणू लागले.

■

## २० : बल्लाळ विनायक

कृतयुगात पल्लीपूर (कुलाबा जिल्हा, सिंधुदेशातील पाली) नगरात कल्याण हा एक शेटजी होता. त्याची बायको इंदुमती. या दोघांचा मुलगा बल्लाळ. हा बल्लाळ लहानपणापासूनच गणपतिपूजेचा नादी. घरच्या लोकांना त्याचे खेळ म्हणजे वेडेचार वाटू लागले. त्यांनी बल्लाळास झाडास टांगून झोडपले. शेजारीपाजारी, स्नेही-सोबती, आणि व्यवहारचतुर तक्रार करू लागले की आपली मुले बल्लाळामुळे बिघडतात!

मग बल्लाळ गणपतीचा वेडाच झाला. तो करुणा भाकू लागला. गणपतीने त्याला दर्शन दिले. त्याने बल्लाळाला वर दिला की, "मी तुझ्यासारख्या भक्तांचे पालन-पोषण करीनच. पण भाद्रपद चतुर्थीला जे माझी मनोभावे पूजा करतील, त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करीन."

तेव्हापासून गणपतीला बल्लाळ-विनायक नाव मिळाले.

■

## २१ : युक्तीच्या गोष्टी

जग निर्माण झाले. ब्रह्मदेव थकला. झोपलाही. त्याच्या कानातील मळातून दोन राक्षस उत्पन्न झाले. मधु आणि कैटभ– ही त्यांची नावे. ते लागले आपले गुण उधळायला. लोक गांगरले, घाबरले. पण त्यांच्या धांदलीकडे कोण लक्ष देतो? सगळ्या देवांनी कानांत बोटे घातली! पण विष्णू तसे कसे करणार? जगाचे पालन करणे हा त्याचा धर्म ना! त्याने या मधु-कैटभांची जिरविण्याचा चंग बांधला!

तें कोठले ऐकायला पण? विष्णू त्यांच्याशी लढला, थोडेथोडके कां काय? (माणसांची) पाच हजार वर्षे! पण ते राक्षस विष्णूलासुद्धा आवरेनात. तेव्हा तो गेला शंकरांच्याकडे. शंकरांनी विचारले, "आपण गणपतीशी सल्ला-मसलत करून मधु-कैटभाशी लढत दिलीत काय?"

विष्णू म्हणाले, "चुकलेच!"

आणि लगेच विष्णू गणपतीकडे गेले. पण गणपती म्हणाले, "समजलो मी सारे! पण अंगावर येणारी उघड लढत द्यायची का, अन् फजिती




गणपतीने शंकर-पार्वतीलाच प्रदक्षिणा घातली.

पावायची का? मधु-कैटभ जर अनावर आहेत, तर पडते घेऊन उपडे पाडा त्यांना."

प्रबल शत्रूला लढत द्यावयाची ही युक्ती विष्णूला पटली! विष्णूने मधु-कैटभाशी लाडीगोडी लावली. आता विष्णूची रग जिरली असे त्या दोघांना वाटले. त्यांची खेळीमेळी झाली विष्णूशी. एक दिवस रंगात येऊन त्यांनी विष्णूला सांगितले, "काय वाटेल ते माग; आम्हीं तुला देऊ!"

विष्णू म्हणाला– ठीक आहे. शब्द पाळा बरे!

मधु-कैटभ– अहो, मागा तर खरे!

विष्णू– तुम्ही मरा!

ते लागले टकमक पाहावयास! तोच विष्णूने त्यांना मांडीवर घेतले व लगेच त्यांचे प्राणही घेतले.

■

## २२ : त्रिपुराचा काटा काढला

वीस हजार वर्षांपूर्वी; रुक्मांगदाची पत्नी मुकुंदा, तिचा मुलगा गृत्समद. याने गणपती प्रसन्न करून घेतला. 'मला देव आणि मनुष्ये पूज्य मानोत' असा वर याने मागितला. गणपतीने त्यास ब्राह्मणत्व देऊन 'गणांनां त्वा' मंत्राचा ऋषी केले. या ऋषीला एकदा एवढी मोठी शिंक आली की, तिच्या आवाजाने पृथ्वी आणि आकाश हादरले. त्याच सुमाराला जास्वंदीच्या फुलासारखा एक तेजस्वी बालक पुढे आला व म्हणाला, "मी तुझा पुत्र आहे."

गृत्समदाने त्या मुलाला 'गणानां त्वा' हा वेदोक्त मंत्र दिला.

त्या मुलानेही गणपतीला प्रसन्न करून घेतले व वर मिळवला की, 'एका शंकरावाचून दुसरा कोणीही तुझा पराभव करू शकणार नाही.' तरतूद म्हणून लोखंडाचे, रुप्याचे व सोन्याचे अशी तीन लढाऊ विमाने गणपतीने दिली. त्यांच्या जोरावर गृत्समदाच्या त्या मुलाने देवलोक, मानवलोक व पाताळलोक जिंकून घेतले आणि त्या तीन लोकांत आपल्या तीन राजधान्या केल्या. अशा सत्तेच्या व सामर्थ्याच्या योगे तो 'त्रि-पुर' म्हणून प्रसिद्धी पावला.

त्रिपुर मग 'सत्ताबले दास करि जो त्रिलोकास। त्याही कृतान्तास नमवीन पायी!!' म्हणे. त्याचा एवढा जुलूम होऊ लागला की, पृथ्वीवर असो, नाहीतर पाताळात असो, कोणाला आपले जीवित सुखरूप वाटेना की चित्त स्वस्थ राहीना! मग वित्त म्हणजे मिळकत कशाची नि मालकी तरी कशाची सुखरूप वाटतीय? शेष, वासुकी, तक्षक असे नाग जेथे भागले, तेथे इतरांचा काय केवा? स्वर्गातही देव चळचळा कापू लागले. गुहा, पर्वतांतून लपले म्हणा ना!!

तेव्हा नारदाने देवांना युक्ती सांगितली, "गणपती म्हणजे देवांचा देव. त्याच्यात ब्रह्मदेव, विष्णू, शंकर या तिन्ही देवांची सामर्थ्ये एकवटली आहेत ना? 'नमस्ते ब्रह्मरूपाय, विष्णुरूपाय ते नमः। नमस्ते रुद्ररूपाय करिरूपाय ते नमः।' अशी त्याची स्तुती तुम्ही सगळेच गाता ना? मग त्या गणपतीपासून वर घेऊन, जर त्रिपुर मातला आहे, तर त्या गणपतीलाच उपाय विचारा की! ज्याने पाणी बिघडविले त्यालाच ते सुधारायला सांगा!"

देवांनी गणपतीची भक्ती केली. गणपती प्रसन्न झाला. त्याने शंकरांना विनवले, "देवा, तुम्ही आता मनावर घेतले पाहिजे. त्रिपुर मातला आहे आणि तुम्ही मनावर घेतले तरच त्याला मरण येणार आहे."

तेव्हा शंकर पुढे आले आणि त्रिपुराचा त्यांनी शेवट केला तो असा. शंकर नंदीच्या रथात उभे राहिले आणि त्यांनी त्रिपुराच्या सैन्यावर बाण सोडले. 'शिवे लक्ष्य साधून धनुष्यी योजिला विष्णुबाण। पाशुपतास्त्र स्थापुनि।। १।। त्या अस्त्रे न लागता क्षण। त्रिपुरा टाकिले जाळून।। २।।'

आपणच केलेल्या चांगल्या गोष्टींचा वाईट शेवट करण्याची वा करविण्याची पाळी येऊ द्यावी का? आणि आली तर काय करायचे? 'दुःखी दुःखच आपुल्याच कृतिचे लागोनि राही मना।'

■

## २३ : थोड्यात गोडी

गणपती हा रानाचा-शेताचा देव आहे. ग्रीकांचा डिमीटर आणि रोमन लोकांचा सीरस, तसाच हिंदूंचा गणपती. गणपतीला शमी, केवडा, दूर्वा आवडतात. रावणापासून त्याने शिवलिंग कसे काढून घेतले, ठाऊक आहे?

रावणाने शंकरांना प्रसन्न करून घेतले होते: तो शिवलिंग घेऊनच लंकेला चालला होता. वाटेत गणपती गुरे राखीत असलेला त्याला दिसला. रावणाने गणपतीला हाक मारली, "अरे, जरा वेळ हे शिवलिंग सांभाळ, मी आलोच. हे शिवलिंग खाली ठेवायचं नाही बरं!" रावण शरीरशुद्धी करावयास गेला. गुराखी गणपतीने ही संधी साधली. रावणाची शरीरशुद्धी संपली नव्हती. गणपतीने त्याला हाका मार मार मारल्या. रावण परत आला नाही. तेव्हा गणपतीने ओरडून सांगितले, "ठेवले रे बाबा, हे शिवलिंगाचे ओझे खाली! आपल्याला आता ते नाही झेपत." रावण परत आला. आणि पाहतो तो काय! शिवलिंग जमिनीत फार खोल जाऊन बसलेले! तेथेच मग 'गोकर्ण महाबळेश्वर' क्षेत्र झाले.

■

## २४ : दुर्वासाचा दुस्वास

दुर्वास ऋषी मोठा तप करणारा. त्याचे तेज वाढत चालले. इंद्राला ते बघवेना. तो देवांचा राजा. त्याला राणीमागून नवी राणी हवी. तो होत चालला होता दुबळा. त्यास वाटले की, आपल्याला काढून टाकून देव एक दिवस दुर्वासाला राजा करतील. म्हणून इंद्र मनातल्या मनात जळू लागला. धुमसून धुमसून जशी आग पेटते, तसा इंद्राचा हेवा धुमसून धुमसून मत्सर झाला. त्याला दुर्वासाचे चांगले काही बघवेनाच!

इंद्राचा मत्सर धुमाकूळ घालू लागला. त्याला जिवाची राणी मिळाली मदकरा. दुर्बुद्धीची मुलगी ती. मग काय मत्सरासुराने सारे देव केले उलथेपालथे! तेव्हा देव गेले गणपतीकडे.

गणपती झाला वक्रतुंड! आणि मत्सरासुराचा काढला त्याने काटा! मत्सरासुर शरण आला. गणपतीने त्याला सांगितले, "दुर्वास तेज वाढवतो; पण काही स्वार्थ करतो का? निःस्पृह, तेजस्वी माणसांच्या वाटेला जाणाऱ्यांच्या कपाळी फक्त कपाळमोक्षच येतो."

■

## २५ : गर्वाचे घर खाली

मिथिलेचा राजा जनक. मोठा दानशूर. त्याबद्दल तो गर्व वाही. त्याच्याकडे गणपती लंबोदर ब्राह्मण म्हणून गेला. त्याचे स्वागत झाले. पक्वान्नेसुद्धा सढळ हाताने वाढण्यात आली. पण ती संपली; ओले-कोरडे सारे अन्न संपले, तरी ब्राह्मणाचे जेवण संपेना. राजा व प्रजा चिंतेत पडले. आता काय करायचे?

इतक्यात त्रिशिरा नावाचा एक दरिद्री पुढे आला. त्याने पूजासाधनांपैकी एक दूर्वा लंबोदराला अर्पण केली. लंबोदर तृप्त झाला, त्याने ढेकर दिली. जनक राजाचा गर्व हरण झाला. ब्राह्मणाचे दारिद्र्य गेले. कारण गणपतीने त्याला संपन्न केले.

■

## २६ : जुन्यातून नवे हाच पुरुषार्थ

पार्वती, षडानन व गणपती हा आपल्या मुलांना एकदा म्हणाली, "बाळांनो, हा पाहा एक लाडू. याला म्हणतात महाबुद्धी. हा अमृताचा केला आहे. देवांची ही कलाकृती आहे. याचा नुसता वास घेतला तरी प्राणी अमर होतो. कारण चित्रकला, लेखनकला, शस्त्रकला या सर्वांमध्ये तो निपुण होत असतो, म्हणून तो यशस्वीच यशस्वी होतो. पाहा, कुणाला पाहिजे हा? सर्व पवित्र तीर्थांची स्नाने करून जो अगोदर येईल, त्याला हा मिळेल."

लगेच षडानन आपल्या मोरावर बसला आणि तीर्थातीर्थावर स्नानासाठी गेला. गणपती कुठेच गेला नाही. आपले आईवडील– शंकर-पार्वती बसले होते, त्यांना घातली प्रदक्षिणा गणपतीने आणि? साष्टांग नमस्कार करून पुढे उभा राहिला. इतक्यात षडाननही आला.

पार्वतीमाता म्हणाली, "छान. छान! तुम्ही दोघेही प्रयत्नवादी आहात. आनंद आहे. 'शक्तीने मिळती राज्ये, युक्तीने कार्य होतसे,' ते तुम्ही दोघांनी दाखवलेत. पण खरे काय आहे, ठाऊक आहे का? 'शक्ति युक्ती जये ठायी। तेथे श्रीमंत धावती॥' सर्व तीर्थे, सर्व नियम, धर्म जरी केले तरी आईबापांएवढे

पुण्यवान तीर्थ, क्षेत्र नाही, आईबापांच्या सेवेची बरोबरी दुसऱ्या कशाने होणार नाही. हे ज्याने आपल्या कृतीने दाखवले, त्या गणपतीलाच मी हा लाडू देणार.''

शंकर म्हणाले, ''बरोबरच आहे ते. आईबापांची सेवा, त्यांच्याबद्दलचा आदर म्हणजे भूतकाळातील जे जे भव्य, उत्कट, दिव्य त्याबद्दलचा आदरयुक्त वारसा चालविणे होय. या जुन्यातून जो प्रभाव शक्ति-युक्तीने पाडतो तोच पुरुषार्थ साधतो व समाजाचा जीवनप्रवाह सतेज राखतो.''

नंतर पार्वतीने सर्व देवांना जमवले, त्यांना झालेली घटना व निर्णय सांगितला. देवांनी तो मानला. गणपतीलाही उचलून घेतले. तेव्हापासून प्रत्येक कार्याच्या प्रारंभी गणपति-पूजा होऊ लागली.

■

## २७ : खटनटाशी खटनट

त्रिपुरासुराचा मुलगा त्रैपुरी. शंकरांनी त्रिपुरासुराला मारले; तेव्हा त्याचा राग त्रैपुरीला आला, हे साहजिकच. या त्रैपुरीची आणि गणपतीची गाठ एकदा एका जंगलात पडली.

गणपतीला पाहताच, शंकराचा सूड घेण्याला ही संधी चांगली आहे, असे त्रैपुरीला वाटले. तो गणपतीजवळ गेला आणि त्याने आपले मनोगत बोलून दाखविले.

त्रैपुरीची भावना गणपती समजू शकला. 'विसरा म्हणूनि कसे विसरते रक्ताचे प्रेमाचे नाते?' हे गणपती जाणत होता. तरीही समाजाचे जीवन सतेज राहण्यासाठी माणुसकीचा न्याय प्रत्येकानेच पाळला पाहिजे, म्हणून त्रैपुरीला गणपती समजावू लागला, ''त्रिपुराने देवांचा छळ छळ केला, तेव्हा जनतेच्या कल्याणासाठी नाइलाज म्हणून शंकरांनी त्याचा काटा काढला!''

''अरे, तूही रक्ताच्याच नात्याने आपल्या बापाचा कैवार घेऊन बोलतो आहेस ना?'' असे म्हणून त्रैपुरीने आपले प्रखर बाण एकामागून एक काढून तीव्रपणे गणपतीवर टाकले. एकंदर दहा बाण गणपतीला लागले. गणपती काय मग कमी करील? त्याने तसाच प्रयोग त्रैपुरीवर केला. तो

राक्षस मूर्च्छित होऊन पडला.

त्याच क्षणी उसळले गणपतीवर त्रैपुराचे साथी– भद्रक, सौभद्र, भीषण, निर्जरांन्तक, चौघे चार बाजूंनी! गदा मारल्या त्यांनी गणपतीवर. गणपती गदायुद्धातही तरबेज! चुकवले त्याने त्या चौघांचे वार. तसे करताच भद्रकाच्या डोक्यावर परशुने मारले, सौभद्राचा तलवारीने शिरच्छेद केला, भीषणाला कुऱ्हाडीने मातीला मिळवले व निर्जरांतकाला खड्गाने परलोकी पाठवले.

इतक्यात त्रैपुरी सावध झाला. गणपतीवर आला चाल करून. बाणांची लढाई सुरू झाली. त्रैपुरीचा रथ, त्याचे घोडे, त्याचे शूर सैनिक पटापट एकामागून एक गारद झाले. म्हणून का त्रैपुरी डरतो? त्याने उगारले वज्र. मग गणपतीही लालच लाल झाला. त्याने आपले बाण ठेवणीत होते तेच काढले! सात त्रैपुरीच्या छातीवर मारले, चार बेंबीच्या बाजूस रोखले आणि पाच डोक्यावरच नेम धरून फेकले. काय झाली असेल दशा त्या त्रैपुरीची? आपल्या धन्याची धडगत नाही हे लक्षात आले सारथ्याच्या. त्याने त्रैपुरीचा नवा रथ मग रणांगणातून काढला बाहेर!!

रणांगणातून पळाला तो मेलाच! मेलेल्याला काय मारावयाचे म्हणून गणपती त्याच्या वाटेस गेला नाही. पुष्कळ वेळाने सावध झालेला त्रैपुरी सारथीला म्हणाला, "ने, ने अगोदर मला गणपती असेल तेथे. त्याचा पराभव करून त्याला मारल्याशिवाय मला चैन पडणार नाही. मला माझ्या बापाचा सूड घ्यायचाच आहे."

आता त्रैपुरी एका मदोन्मत्त हत्तीवर बसून लढू लागला. त्या हत्तीनेच गणपतीच्या बाजूचे कितीतरी देव लोळविले. त्या हत्तीचे दात व सोंड त्रैपुरीचे अर्धे काम करीत व राहिलेले अर्धे त्रैपुरीचे बाण करीत.

मग गणपतीने नवीन व्यूह रचला. बाणांचा वर्षाव झाला. तुमुल युद्ध झाले. रणगर्जनांनी आभाळ दुमदुमले. स्वतः गणपतीने त्रैपुरीला आपल्या परशुने हत्तीसह खांडून काढले.

गणपतीचा जयजयकार झाला.

■

## २८ : भूतानातील यशोलोचना

किती सांगाव्या गणपतीच्या लीलावतारी गोष्टी. सामान्यपणे सर्वजण समजत आले आहेत त्याप्रमाणे गणपती हा शंकर-पार्वती ह्यांचा मुलगा. भूतान हे शंकराचे राज्य. त्यांची राजधानी कैलास.

भूतानचे लोक देवांच्या इतके सुधारलेले नव्हते. त्यांची राहणी रानवट असे. गणपतीचेही रूप ओबडधोबडच! लांब नाकाचा, लाल रंगाचा पेहेलवान गडी तो! पण तो सर्वांशी हसतमुखाने बोले आणि प्रेमळपणे व्यवहार करी. त्याचे शरीर ढगळ, राहणी साधी, पण विचार थोर, बुद्धी चलाख आणि ज्ञान खोल, त्यामुळे गणपतीची छाप तेव्हाच पडे!

गदा, तलवार, भाला, त्रिशूळ, धनुष्य, वज्र, कुऱ्हाड, पट्टा इत्यादी शस्त्रास्त्रे गणपती सहज हाताळी. फार काय, शंकराचे पाशुपत अस्त्रही तो चांगले चालवी! त्यामुळे गणपती हा सेनापती म्हणून चांगलाच होता.

गणपती उत्तम संघटकही होता. 'आधी केले मग सांगितले' अशा त्याच्या योजना असत. स्वतः तो ग्रंथलेखक होता. व्यासमहर्षींचे महाभारत एकसारखे गणपतीनेच लिहिले हे सुप्रसिद्ध आहे. ग्रंथाग्रंथांतील तत्त्व, मर्म, बीज त्याला कसे हातातील मोदकासारखे असे. 'गुरुविद्या-गुरुशास्त्रकृतोद्यम' अशांसारख्या पदव्याही त्याला मिळाल्या होत्या. वेद, शास्त्रे, गणित, सहकार, इतिहास हे सारे विषय त्याच्या तळहातावरचे आवळेच होते जणू!

आपल्या राष्ट्राच्या संघटनेखाली त्याने पहिले काम केले ते खानेसुमारीचे. त्यावरून स्त्री, पुरुष, त्यांचे धंदे, त्यांची पात्रता त्याला कळून चुकल्या. मोजल्या गेलेल्या लोकांचा समूह म्हणजे 'गण'. मोजले कोण जातात? 'असुनि जिवंतहि मेले।' ते लोक का मोजले जातात? ज्यांच्याजवळ काही गुण आहेत आणि 'थोडाही गुण मिळता' जे घेतात, तेच लोक मोजले जातात. तसे लोक हेरून त्याने एकत्र आणले आणि झाला तो त्यांचा नायक.

तो स्वतः वि-नायक होता; म्हणजे त्याला कोणी सांगतासवरता नव्हता, तर तो स्वतंत्र बुद्धीने चाले व आपले विशेष लोकांना दाखवून त्यांना पुढे पुढे नेई. गणपतीने समान गुणी व सह-वासी लोकांची मंडळे बनवली. प्रत्येक मंडळाला एकेका बारीक-सारीक गोष्टींवर लक्ष ठेवणारा 'अध्यक्ष'

दिला. समाजातल्या सामान्य माणसापासून शिस्तीची, कामविभागणीची, सहकाराची एक साखळी तयार झाली. प्रत्येक मंडळाने आपापल्या मंडळाची प्रगती व सुख सांभाळीत राहावयाचे आणि दुसऱ्या मंडळाशी शक्य तेवढा सहकार करीत राहावयाचे. त्यामुळे गणपतीच्या संघटनेला राष्ट्रीय स्वरूपच आले आणि सहा महिने लोटतात न् लोटतात तो भूतानमध्ये नवचैतन्य खेळू लागले.

मग गणपतीने सगळीकडे ग्रंथालये, औषधालये, शिक्षणालये, संरक्षणालये सुरू केली. या सगळ्या संस्थांतून तयार होणाऱ्या नागरिकांशी बेपर्वाइने वागण्याला कोणी धजतच नसे. कारण राष्ट्रीय सरकार जर त्यांची कदर करते तर त्यांची जनता आणि जनतेची ते सदैव कदर करणारच.

सत्ता आणि सुबत्ता माणसाला माज आणतात. तसा माज कुणाला आलाच आणि तो जर का शासनाची शिस्त मोडू लागला, तर त्याला ताळ्यावर आणावयास गणनाकर्ता किंवा दंडनायक या नावाचा अधिकारी नेमलेला असे. कोणत्याही राष्ट्राची राज्यव्यवस्था कर्तव्यकठोर, न्यायनिष्ठुर पण त्याचबरोबर माणुसकीने उदार असावी लागते. रोगी निरोगी कसा होईल, उद्योगधंद्यांत अडथळे येतील तर त्यांचे निवारण कसे होईल, बेकार म्हणून कोणीच कसा उरणार नाही, त्याची काळजी घेणारी कार्यालयेही गणपतीने आपल्या संघटनेतून उभारली होती, ती तेवढ्याचसाठी. या सर्वांमुळे शासन ऊर्फ सरकार आणि जनसामान्य यांचा नुसता संपर्कच नव्हे, तर जिव्हाळा गणपतीने निर्माण केला.

आपल्या भूतान या राष्ट्राची प्रतिष्ठा वाढावी म्हणून आपल्या सैन्याची संरक्षक मदतही गणपती दुसऱ्या राष्ट्रांना देत असे. भूतानच्या सैनिक-सेनापतींपैकी एक वीरभद्र नावाचा पराक्रमी पुरुष होता. त्याचे यथार्थ गुण गावयास शब्द अपुरेच पडतात. इन्द्र-आदिकरून देव शंकरांच्या भूतगणाच्या मानाने केवढे तरी सुधारलेले. पण त्यांना जेव्हा सैनिक साहाय्याची आवश्यकता वाटली, तेव्हा गणपतीने त्यांना सैनिकी साहाय्य दिले. त्यांतील वीरभद्राच्या फळीने अतुल पराक्रम केला. त्यामुळे भूतगणांकडे तुच्छतेने पाहत असत तो मनू पालटला. भूतगणाला देवलोकी सन्मानाचे स्थान मिळू लागले. फार काय, स्वतः गणपतीची प्रतिष्ठा एवढी वाढली की, तो देवमान्य तर झालाच; पण गणपती अनुकूल असला तर कसल्याही विघ्नाची, अडथळ्याची,

छे छे! – कळिकाळाचीही भीती नाही अशी ठाम समजूत सगळीकडेच होऊन राहिली. उलट गणपती जर का उलट गेला तर आपली धडगत नाही, हेही सगळीकडे कळून चुकले. त्यामुळेच गणपतीला 'विघ्नहर्ता' अशी पदवी प्राप्त झाली!!!

गणपतीला त्याचे काहीच नसे. आपले लोकसेवेचे कर्तव्य करावयाचे एवढेच त्याला ठाऊक!! मग 'कोणी निंदा, कोणी वंदा!!'

जो राजा अथवा पुढारी लोकांची आईबापासारखी काळजी घेतो, त्याला लोकही 'बाबा' किंवा 'बाप्पा' म्हणतात. लोकांचे असे आपुलकीचे वैभव गणपतीने आपलेसे केले होते. म्हणूनच सर्व हिंदुस्थानभर लोक त्याचे स्मरण प्रत्येक शुभकार्याच्या प्रारंभी करतात व त्याला 'गणपती बाप्पा' म्हणून केव्हाही नमस्कार करीत असतात.

## गणपतीचे स्वरूप

सगळ्या हिंदुस्थानात ब्रह्मदेवाचे क्षेत्र आहे पुष्कर सरोवराजवळ. तेथे दरसाल मोठा उत्सव होतो. ब्रह्मदेव हा उत्पत्तीचा देव, निर्माणदेव. त्याचा हिंदुस्थानभर उत्सव होतो. मृगनक्षत्रापर्यंत शेतपिकांच्या लावणी-उगवणीचा मोसम असतो, त्यातील भाद्रपद महिन्याच्या चतुर्थीला आपण गणपती घरोघरी पूजतो. जुन्या पिकांचे अंदाज व नव्या पिकांचे आराखडे आखण्याचा तो काळ असतो. जगण्यासाठी, चांगले जगण्यासाठी सकस अन्न लागते. तेव्हा निर्माण, उत्पन्न म्हणजे जगण्याच्या शास्त्रकलांचा देव पूजलाच पाहिजे. शेतकरी मोट धरून शेताला पाणी पाजताना 'गणा-गणा' म्हणून कामाला सुरुवात करतो. मोजण्यासारखे, मोलाचे काम म्हणजे गणपतीची पूजा.

नवे उत्पन्न करताना, ते जीव लावून केले पाहिजे. चंचल मन असता कामा नये. म्हणून गणपती पूजनादिवशी, विशेषतः शेतकरी सांजेचा गणपती पूजतो. त्या वेळी मन चंचल होऊ नये म्हणून मनाचा देव जो चंद्र तो पाहावयाचा नसतो.

शेतपिकांचा एक बारका व गुप्त छुपा शत्रू उंदीरमामा. नेहमी भूमिगत. चोरून पायाला चावला तर फुंकून फुंकून गोड चावतो. त्यावर गणपती स्वारी करतो, म्हणजे ताब्यात ठेवतो व आपला 'सांगकाम्या' करून टाकतो. कोल्ह्या-लांडग्यासारख्या शेताच्या बड्या शत्रूंना दराऱ्यात ठेवण्यासाठीच गणपतीने हातात त्रिशूळ घेतलेला असतो. शेतीच्या गारव्याला राहून प्रसंगी

निढळाच्या घामाने प्रयत्नपूजा करणाऱ्या पुजाऱ्याला, शेतकऱ्याला चावा घेणारा साप-नाग गणपतीने मुठीत आवळलेला असतो. पण गणपती हा शेतीचा देव आहे हे मोदकावरून जास्त कळते. नारळ, गूळ, तांदूळ यांच्यापासून तयार केलेला नसतो का मोदक? हिंदुस्थान हा पहिल्यापासून शेतीप्रधान देश. 'उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी' अशी म्हणच हिंदुस्थानच्या भाषाभाषांतून आहे. त्यामुळेच शेतकऱ्याला 'बळीराजा' म्हणतात. राजा म्हणजे मुख्य माणूस, सुखी माणूस, भोवतालच्या मंडळींना सुखी राखणारा माणूस. खरा पुढारी. म्हणूनच शेतीच्या देवाला गणपती म्हणतात. पुढारी म्हटला तरी तो मोठ्या डोळ्यांचा, बारीक नजरेचा, लांबचा-दूरवरचा वास येणाऱ्या लांबट नाकाचा, उंदरासारख्या गोडबोल्यांना आपल्या पायपोशीजवळ ठेवणारा, नागासारख्या विषारी गुंडांना मुठीत आवळणारा, अनेकांच्या अनेक गोष्टी पोटात ठेवणारा, बसल्या बैठकीवरून सगळ्यांना जीवनाचा मार्ग दाखविणारा, आपल्याकडे येईल त्याला आनंद (मोद-क) देणारा, आणि सर्वांचे कल्याण व्हावे असा आशीर्वाद देणारा व वेळप्रसंगी शत्रूला शिक्षा करण्याकरता शस्त्र पेलणारा, असाच लागतो ना?

मग तसेच आहे की गणपतीबाप्पाचे स्वरूप.

## लोकाचार-रहस्य

इतिहास-संशोधक विसुभाऊ राजवाडे म्हणत की 'अडीच हजार वर्षांपूर्वीपासून गणपती ही दक्षिण भारताची देवता आहे.' व्यासमहर्षींनी महाभारत सांगितले आणि गणपतीने एकसारखे लिहिले अशी कथा आहे. पण वेदांपासून गणपती ही देवता आहे. 'ब्रह्मणस्पतिः' असा गणपतीचा उल्लेख वेदांत सापडतो. कृतयुगातला 'कश्यपपुत्र', सिंह हे वाहन असलेला 'विनायक', हा गणपतीचा अवतार मानतात; त्रेतायुगातील शिवपुत्र 'मयूरेश्वर' आणि द्वापरयुगातील 'गजानन' हेही गणपतीचेच अवतार मानतात, आणि घोडा वाहन घेऊन कलियुगात धूम्रकेतू होऊन अवतरणारा हाही गणपतीचाच अवतार होय. म्हणजेच गणपती हा नुसताच संघनायक नाही; तो वस्तुमात्रांच्या व व्यक्तिमात्रांच्या जीवनाचे एकटे एक चैतन्य आहे. हे चैतन्य सगळ्या जगाच्या कल्याणाकरता झटले. असे शहाणपणाने, कर्तबगारीने, परोपकारी वृत्तीने जेथे जेथे आढळले तेथे तेथे गणपतीचा, शुभजीवनाचा अवतार झाला असे समजण्यात आले आहे.

दक्षिण रशिया, मध्य अमेरिका, मेक्सिको, तुर्कस्थान इत्यादी ठिकाणी गणपतीच्या मूर्ती सापडल्या आहेत. जावा, सुमात्रा, बोर्निओ, फिलिपाईन येथेही गणपतीच्या मूर्ती सापडल्या आहेत. त्या तेथे सार्वजनिक रीतीने पूजल्या जात होत्या. संशोधकांचे याबाबत एकमत आहे. तिबेटातही गणपतीची उपासना बुद्ध धर्मापूर्वी होती. ती वर सांगितल्याप्रमाणे ईश्वरी चैतन्याच्या अवतारकल्पनेला अनुसरूनच होती. पहिला अवतार कश्यप अदितिपुत्र. त्या विनायकाला शिव पार्वतींनी आपला मुलगाच मानले होते. पुढे दोन अवतार शिव पार्वतीपोटीच झाले. म्हणून गणपती हा शिव पार्वतीचाच मुलगा असे सर्वकाळी मानतात.

भारतीय आर्य प्रसरणशील होते; त्यांच्याबरोबर त्यांच्या परंपराही सर्वत्र पसरल्या होत्या. अर्थात परमेश्वरी अवतारकल्पनांबरोबर गणपतीची पूजाही सर्वत्र गेली. निरनिराळ्या युगांत गणपतीचे निरनिराळे अवतार मानले गेल्यामुळे सर्व जगात गणेशजन्माचे दिवसही वैशाखी पौर्णिमा,ज्येष्ठ शुद्ध चतुर्थी, भाद्रपद शुद्ध चतुर्थी व माघशुद्ध चतुर्थी हे मानण्यात येतात. त्यातही भाद्रपदात मोठा दहा दिवस उत्सव सर्वत्र होत असतो. पण जगाच्या निर्मात्याचे उत्सव कृतज्ञतेने नेहमीच करावेत. म्हणून कोणतेही काम करताना देव गणपतीची पूजा करूनच पुढे चलावे, अशी भारतीय संस्कृती आहे, म्हणूनच कोणत्याही आरंभाला 'श्रीगणेशाय नमः' म्हणतात.

■ ■ ■

**पु. धां. उर्फ बाबुराव गोखले**
**यांची बालवाङ्मय सेवा**

❖

गणपती बाप्पा

जय बजरंग

समर्थ रामदास

स्वामी रामतीर्थ

लो. टिळक

गोखल्यांच्या गोष्टी

भले भले साने गुरूजी!

बंडवाले नानासाहेब

❖

**समाजभूषण बाबुराव गोखले**
**स्मारक समिती**
२७३, शनिवार पेठ, पुणे ४११०३०

# गणपती बाप्पा

पु. पां. गोखले

गणपती म्हणजे बुद्धी देवता!

प्रत्येक कार्याच्या आरंभी श्री गणेशाची पूजा करतात. गजानन, विनायक, लंबोदर इत्यादी अनेक नावे असलेल्या गणपतीचे मुख गज म्हणजे हत्तीचे असल्यामुळे गजमुख हे पण एक नाव आहे.

सर्व संकटांचा नाश करणारा असा हा देव. त्याच्या जन्माची कथा, त्याचा पराक्रम, त्याची हुशारी, त्याची मातृ-पितृ भक्ती यांच्या कथा या पुस्तकात तुम्हास वाचायला मिळतील.

चला तर मग ! घ्या गणपतीचे नाव आणि सुरवात करा वाचायला.

गणपती बाप्पा मोरया!

कव्हर छपाई 'विनायक आर्टस'